॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव, दि. ५ जून : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या सहकार्याने तसेच नवोपक्रम व नवसंशोधन विभागाच्या पुढाकारातून दिनांक २ ते ४ जून २०२६ या कालावधीत प्रतिभावान विद्यार्थ्यांसाठी तीन दिवसीय निवासी "केबीसीएनएमयू युवा सक्सेस लॅब २०२६" नेतृत्व विकास कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. दि. २ जून २०२६ रोजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले.

सांस्कृतिक, शैक्षणिक,संशोधन, राष्ट्रीय सेवा योजना आणि एन.सी.सी. या विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनिय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा नेतृत्वगुणांचा आणि कौशल्यांचा अधिक विकास व्हावा. तसेच त्यांना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात प्रगतीच्या नव्या संधी उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने तीन दिवसीय निवासी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू प्रा. माहेश्वरी यांनी विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, प्रभावी संवाद कौशल्य, नाविन्यपूर्ण विचारसरणी आणि यशस्वी जीवनासाठी आवश्यक मानसिकता विकसित करण्याच्या दृष्टीने या कार्यशाळेचे महत्त्व अधोरेखित केले.

उद्घाटन सत्रास दीपस्तंभ मनोबल संस्थेचे संस्थापक तथा विद्यापीठाच्या सल्लागार समितीचे सदस्य यजुर्वेंद्र महाजन, विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विनोद पाटील, वित्त व लेखाधिकारी सीए रविंद्र पाटील, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रविण महाले, नवोपक्रम व नवसंशोधन मंडळाचे संचालक डॉ. राजेश जवळेकर तसेच केसीआयआयएलचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. नवीन खंडारे उपस्थित होते.

यावेळी यजुर्वेंद्र महाजन आणि डॉ. तुषार चोथानी यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. व्यक्तिमत्त्व विकास, नेतृत्व कौशल्य, करिअर नियोजन, संवादकौशल्य, आत्मविश्वास वृद्धी, संघभावना आणि विविध जीवनकौशल्यांवर आधारित सत्रांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेत आपल्या क्षमता आणि नेतृत्वगुणांचा परिचय करून दिला.

या कार्यशाळेचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे मनोबल दिव्यांग केंद्रातील विद्यार्थ्यांनी देखील उत्साहाने सहभाग नोंदविला. सर्वसमावेशक शिक्षण आणि समान संधी या संकल्पनेला मूर्त स्वरूप देत दिव्यांग विद्यार्थ्यांनी विविध सत्रांमध्ये सहभाग घेत प्रेरणादायी उदाहरण निर्माण केले. त्यांच्या सहभागामुळे कार्यशाळेला अधिक व्यापक सामाजिक आणि शैक्षणिक स्वरूप प्राप्त झाले.

दि. ४ जून २०२६ रोजी आयोजित समारोप सत्राच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे उपस्थित होते. या सत्रास राज्यपाल नियुक्त विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे, डॉ. जयेंद्र लेकुरवाळे, डॉ. प्रविण महाले आणि डॉ. राजेश जवळेकर यांचीही उपस्थिती होती. मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या निवासी कार्यशाळेत विविध सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, संशोधन, क्रीडा, एन.सी.सी. व राष्ट्रीय सेवा योजना यात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या ४३ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. सहभागी विद्यार्थ्यांच्या सकारात्मक प्रतिसादामुळे कार्यशाळा अत्यंत यशस्वी ठरल्याचे दिसून आले.

कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी मनोबलच्या वतीने श्रुती भोळे, रितेश चौधरी, गायत्री जवळेकर तसेच इतर सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभाग, नवोपक्रम व नवसंशोधन विभाग आणि केसीआयआयएल विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही मोलाचे योगदान दिले.

**बातमी नं. २**

जळगाव, दि. ५ जून : जागतिक पर्यावरण दिनानिमित्त कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील पर्यावरण व भूशास्त्र प्रशाळेतर्फे विविध पर्यावरणपूरक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये विद्यापीठ परिसरातील प्लास्टिक कचऱ्याचे संकलन करून परिसर प्लास्टिकमुक्त करण्याचा संकल्प राबविण्यात आला. तसेच पर्यावरण संवर्धनाचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचावा आणि वृक्षारोपणाचे महत्त्व अधोरेखित व्हावे यासाठी विद्यापीठ परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

या उपक्रमाच्या प्रारंभी पर्यावरण संरक्षणाची सामूहिक जबाबदारी ओळखून शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि संशोधक विद्यार्थ्यांनी विद्यापीठ परिसरात स्वच्छता मोहीम राबविली. परिसरात विखुरलेला प्लास्टिक कचरा गोळा करून त्याची योग्य विल्हेवाट लावण्यात आली. यानंतर जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून विविध प्रकारच्या वृक्षांचे रोपण करण्यात आले.

या कार्यक्रमास विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे तसेच राष्ट्रीय सेवा योजना संचालक प्रा. प्रवीण महाले यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी प्र कुलगुरू प्रा. इंगळे यांनी पर्यावरण संवर्धनासाठी युवकांनी पुढाकार घेण्याची गरज व्यक्त केली. पर्यावरणाचे रक्षण ही काळाची गरज असून प्लास्टिकमुक्ती आणि वृक्षसंवर्धन यांसारख्या उपक्रमांमधून समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणता येईल, असे त्यांनी सांगितले.

जागतिक पर्यावरण दिनाच्या या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पर्यावरण व भूशास्त्र प्रशाळेतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच संशोधक विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. या उपक्रमामुळे पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृती होण्यास आणि हरित, स्वच्छ परिसर निर्मितीच्या संकल्पनेस बळ मिळण्यास मदत झाली.

……………………………………………………………………………………………………………………

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: ५ जून, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता